**प्रेसनोट पुणे** **दि.०२/०५/२०१९**

**दत्तवाडी पो. स्टे. पुणे शहर**

## दत्तवाडी पोलीसांचा पोस्टल मतदानात १०० टक्के सहभाग

प्रत्येक शासकीय कर्मचारी यांनी निवडणुकी मध्ये मतदान करणे आवश्यक आहे. अनेक शासकिय अधिकारी व कर्मचारी हे निवडणुक काळात कर्तव्यावर असल्याने यांचे मतदान बुडून जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर मतदानाचा टक्का घसरतो हे कमी करण्यासाठी निवडणुक आयोगाने प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांच्या करीता टपाल मतदान सोय उपलब्ध करुन दिली आहे. पोलीस विभागातील अधिकारी व कर्मचारी हे निवडणुक काळात बंदोबस्ता मध्ये व्यस्त असल्याने त्यांना मतदाना पासुन वंचित रहावे लागु नये,मतदान हे आपले राष्ट्रिय कर्तव्य आहे,आणि ते प्रत्येकाने पार पाडावे यासाठी निवडणुक आयोगाच्या सुचने नुसार पुणे शहराचे मा.पोलीस आयुक्त,डॉ.के.वेंकटेशम् यांनी पोलीस विभागातील प्रत्येकाला मतदान करता यावे याकरीता पोस्टल बॅलेट पेपर मतदान उपलब्ध करुन दिले. त्यानुसार दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे ११० पोस्टल बॅलेट पेपर उपलब्ध झाले असुन,१०० टक्के अधिकारी कर्मचारी यांनी मतदान केले आहे असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक,देविदास घेवारे यांनी सांगितले आहे. आपला देश लोकशाहीच्या दृष्टिने सक्षम राहण्यासाठी प्रत्येकाचे मतदान होणे आवश्यक आहे. याकरीता दत्तवाडी पोलीस स्टेशनच्या प्रत्येक अधिकारी कर्मचारी यांनी जागरुकतेने पोस्टल मतदान प्रक्रियेत सहभाग घेतला आहे.




